ISSN 2394-5303

Issue-40, Vol-03, April-2018

# Printing Area™

International Multilingual Research Journal



UGC Approved
Jr.No.43053

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

April 2018, Issue-40, Vol-03

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Co-Editor
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Printing Area


## Editorial Board & Advisory Committee

1) Dr. Vikas Sudam Padalkar (Japan)
2) M.Saleem, Sialkot (Pakistan)
3) Dr. Momin Mujtaba (Saudi Arebia)
4) N.Nagendrakumar (Sri Lanka)
5) Dr. Wankhede Umakant (Maharashtra)
6) Dr. Basantani Vinita (Pune)
7) Dr. Upadhya Bharat (Sangali)
8) Jubraj Khamari (Orissa)
9) Krupa Sophia Livingston (Tamilnadu)
10) Dr. Wagh Anand (Aurangabad)
11) Dr. Ambhore Shankar (Jalna)
12) Dr. Ashish Kumar (Delhi)
13) Prof.Surwade Yogesh (Satara)
14) Dr. Patil Deepak (Dhule)
15) Dr. Singh Rajeshkumar (Lucknow)
16) Tadvi Ajij (Jalgaon)
17) Dr.Patwari Vidya (Jalna)
18) Dr.Varma Anju (Gangatok)
19 ) Dr.Padwal Promod (Waranasi)
20) Dr.Lokhande Nilendra (Mumbai)
21) Dr.Narendra Pathak (Lucknow)
22) Dr.Bhairulal Yadav (West Bangal)
23) Dr.M.M.Joshi, (Nainital)
24) Dr.Sushma Yadav (Delhi)
25) Dr.Seema Sharma (Indor)
26) Dr. Choudhari N.D. (Kada)
27) Dr. Yallawad Rajkumar (Parli v.)
28) Dr. Yerande V. L.(Nilanga)
29) Dr. Awasthi Sudarshan (Parli v.)
30) Dr Watankar Jayshree
31) Dr. Saini Abhilasha
32) Dr. Prema Chopde (Nagpur)
33) Dr. Vidya Gulbhile (M.S.)
34) Dr. Kewat Ravindra (Chandrapur)
35)Dr. Pandey Piyush (Delhi)
36) Dr. Suresh Babu (Hydarabad)
37) Dr. Patel Brijesh (Gujrat)
38) Dr. Trivedi Sunil (Gujrat)
39) Dr. Sarda Priti (Hydarabad)
40) Dr. Nema Deepak (M.P.)
41) Dr. Shukla Neeraj (U.P.)
42) Dr. Namdev Madumati (M.P.)
43) Dr. Kachare S.V. (Parli-v)
44) Dr. Singh Komal (Lucknow)
45) Dr. Pawar Vijay (Mumbai)
46) Dr. Chaudhari Ramakant (Ja


Indexed

UGC Approved Journal
UGC
Jr.No.43053

IMPACT 5.011 iijif FACTOR


Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 3418002



**Note :** The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Printing Area' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)


http://www.printingarea.blogspot.com

26) खानदेशातील औद्योगिक क्षेत्रात प्रताप शेटजींची कामगिरी
**प्रा. डॉ. वसंत श्रावण देसले** || 104

27) संगीताच्या प्रचार व प्रसारामध्ये दृक-श्राव्य साधनांचे योगदान
**प्रा. सतिष डि. जमधाडे, कुंभारी अकोला** || 108

28) महिला सबलीकरणात आड येणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक प्रथा : एक समाजशास्त्रीय अभ्यास
**प्रकाश कोथळे, मुदखेड** || 110

29) जागतिकीकरण आणि बोलीभाषा : संशोधनाच्या संधी
**कोतकर सचिन माधवराव, डॉ.नगरकर संजय पांडुरंग, अहमदनगर** || 113

30) 'दप्तर' कथासंग्रहातील कथांची आशयसूत्रे
**प्रा. डॉ. बाळासाहेब शंकर शेळके, श्रीरामपूर, जि. अहमदनगर** || 117

31) महात्मा गांधीजींचे अहिंसा विषयक विचार : एक सामाजिक आकलन
**प्रा. डॉ. ए. टी. शिंदे, सिडको नांदेड** || 123

32) मराठीतील संमोहनविषयक ग्रंथाचे लेखक, जीवनकार्य व योगदान
**रामकृष्ण जगताप** || 128

33) उतररामचरितम् में भवभूति द्वारा प्रतिपादित प्रेमानुभूति
**अमित कुमार, नाहड़ रेवाड़ी (हरियाणा)** || 134

34) भारतीय संस्कृति और सूफी कवि
**डा० फैयाज़ हैदर, अलीगढ़** || 136

35) 'दो मुर्दों के लिए गुलदस्ता' में उत्तर आधुनिकता
**डॉ॰ चन्द्रप्रकाश मिश्र, नई दिल्ली** || 139

36) 'आक्रोश' उपन्यास इक्कीसवीं सदी की नारी का प्रखर रुप
**डॉ. सन्मुख नागनाथ मुच्छटे, माकणी जिला उस्मानाबाद** || 144

37) सृष्टि की उत्पत्ति में मानव समाज का निर्माण एवम् विकास
**डॉ. महेशभाई जे. पटेलल,(सदर फलिया-वांसदा), ता.वांसदा, जि.नवसारी** || 146

38) जशपुर जिले का पुरातात्विक महत्व
**डॉ. विजय रक्षित, जशपुर (छ.ग.)** || 150

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

27

# संगीताच्या प्रचार व प्रसारामध्ये दृक-श्राव्य साधनांचे योगदान


प्रा. सतिष डि. जमधाडे
(संगीत विभाग)
श्री गणेश कला महा. कुंभारी अकोला


=============***********==============

**स्तावना :-**

आधुनिकी करणाच्या काळात विज्ञानाच्या श्रेत्रात अनेक शोध लागेल आणि या शोधामुळेच मानवी जीवनातील अनेक दालने समृध्द झाली. त्यात संगीत क्षेत्र तरी कसे अपवाद राहील. या वैज्ञानिक शोधाचा संगीताला आणि पर्यायाने संगीताच्या रसीक श्रोत्याला आणि अभ्यासकाला खुपच फायदा झाला आहे. विज्ञानातील प्रगतीचे फलीत म्हणुन दृक, श्राव्य साधने संगीताला अत्यंत उपयोगी ठरलेली आहेत. असे दिसुन येते. त्या साधनांचा थोडक्यात आढावा घेवू.

**दृक साधने :-**

व्याख्या :- जी साधने केवळ डोळयांनी दिसतात त्याना दृक साधने असे म्हणतात. उदा. पुस्तके, चित्रे, शिल्प, नकाशे इ.

ज्यावेळी ही वैज्ञानिक माध्यमे उपलब्ध नव्हती तेव्हा गुरु-शिष्य परंपरेप्रमाणे शीष्य गुरुकडुन विदया ग्रहन करीत असे. गुरु गृही राहुन गुरु जे शिकवतील त्याचे मनन करणे व त्याचा रियाज करणे या स्वरुपाची पध्दत प्रचलीत होती. मात्र या पध्दतीत एकदा म्हटलेले संगीत जतन करुन ठेवण्याची सोय नव्हती पं. भातखंडे व पं. पलुस्कर त्यांनी स्वरलीपीच्या साहाय्याने पुस्तके लिहुन संगीताचे धन सुरक्षीत टेवण्याचा प्रयत्न केला. याच लिपीच्या आधारे अनेक तज्ञांनी विविध रागांच्या बंदीशी लिपीबध्द करुन ठेवल्या. आजही संगीत साधक, विदयार्थी तसेच शिक्षक या साधनाच्या साहाय्याने संगीत अध्ययन व अध्यापन करतांना दिसतात. पुस्तकां प्रमाणेच चित्रे, शिल्पे या ललीत कलांच्या आधारे सुध्दा संगीताचे ज्ञान अर्जीत करण्यास मदत होते. राग-रागीण्यांवर आधारीत चित्रावरुण पुरुष राग, स्त्री राग असे रागदर्शन तर घडतेच शिवाय रागाचे स्वरुप, त्याचा भाव ही स्पष्ट होतो. संगीत जतन करुन त्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी दृक साधनांचा मोठा सहयोग लाभला असे म्हणावे लागते.

**श्राव्य साधने :-**

व्याख्या :- जी साधने कानाने श्रवण करता येतात त्यांना श्राव्य साधने असे म्हणतात. उदा. रेडिओ टेपरेकॉर्डर इ.

**१) रेडिओ :-**

विज्ञानाच्या अविष्कारातील मनुष्य प्राण्यास उपयुक्त ठरलेल्या अनेक महत्वाच्या अविष्कारापैकी रेडिओ हे उपकरण आहे. घरातच नव्हे तर आपल्या सोबत कोठेही अनेक प्रकारचे संगीत असो की, जगातील घडामोडी याची माहीती रेडीओव्दारे सतत मीळत राहते. मार्कोनी या शास्त्रज्ञाने रेडीओचा शोध लावला. भारतात रेडीओचा प्रवेश २० व्या शतकाच्या तिसज्या दशकात झाला. "बहुजन हिताय बहुजन सुखाय" अशी घोष वाक्य असनारी आकाशवाणी अल्पावधीतच लोकप्रिय झाली. ट्रान्झीस्टर हे रेडिओचे जुळे भावंड म्हणायला हरकत नाही. आकाशवाणीचा मुख्य उद्देश मनोरंजन असल्याने त्यात संगीताला अग्र स्थान मिळाले आहे हें सांगावयास नको.

**रोडीओ चे फायदे :-**

१) शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत, सुगम संगीत, निरनिराळया वादयांचे वादन, इ. सर्व प्रकारचे संगीत आपल्याला घर बसल्या ऐकता येते.

२) दुसरे म्हणजे आपल्याला न आवडणारा कार्यक्रम बंद करुन लगेच दुसरा कार्यक्रम लावण्याची सोय यात आहे.

३) एखादया ख्यातनाम गवयाचे गाणे प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या ठिकाणी जावुन ऐकता आले नाही तर या साधनाने घरबसल्या आरामात ऐकता येते.

४) मनोरंजना बरोबर संगीत शिक्षण ही आकाशवाणीने शक्य झाले. आकाशवाणी वरील कलाकारांच्या मुलाखती मुळे तसेच एखादा गीत प्रकार उदा. ख्याल टुमरी गझल प्रात्यक्षीकासह. व्याख्यान, चर्चासत्र आयोजीत केल्याने तसेच दिवंगत कलाकारांच्या स्मृती प्रित्यर्थ संगीताचे कार्यक्रम आकाशवानीवर सादर केल्याने आपल्याला आवडनाज्या कलाकाराची प्रस्तुती, आवाज लावण्याची रित इ. आपल्याला रेडिओ द्वारे समजुन घेता येते. त्याच बरोबर विविध भाषेतील विविध गीत प्रकार ही रेडिओवरुन ऐकायला मिळतात. रेडिओबरोबर ग्रामोफोन,

रेकॉर्ड प्लेअर या साधनांचाही उल्लेख श्राव्य माध्यमामध्ये केला जातो.

**२) टेपरेकॉर्डर :-**

आपल्या आवती भोवती निर्माण झालेला ध्वनी त्याच स्वरुपात संग्रहीत करता येईल का? या प्रश्नावर संशोधन करुन शेवटी शास्त्राज्ञांना टेपरेकॉर्डर चा शोध लागला. श्राव्य साधनाचे विकसीत रुप जन्माला आले पुर्वीचे टेपरेकॉर्डर हे आकाराने मोठे असत. यात ६-७ इंच व्यासाची ध्वनी फीतींची चक्रे बसवुन ध्वनी मुद्रण करावे लागे. अजुनही आकाशवाणीच्या स्टुडीओत अश्या टेपरेकॉर्डरचा उपयोग होतो.

टेपरेकॉर्डर मध्ये झालेला क्रांतीकारी बदल म्हणजे लहान आकाराचा कॅसेट टेपरेकॉर्डर होय. हयात छोटया चक्रांकीत ध्वनीफीती मध्ये (कॅसेट) एका बाजुवर ३० ते ४५ मीनीटांपर्यतचे कार्यक्रम मुद्रीत करता येतात. ही संगीताच्या श्रोत्यांसाठी, तसेच अभ्यासकासाठी मोठी पर्वणीच आहे.

**फायदे :-**

१) आपल्याला हव्या त्या कलाकारांचे गायन वादन ध्वनी मुद्रीत करुन ते केव्हाही ऐकता येते. महत्वाचे म्हणजे गायन वादनातील विशीष्ट जागा बसविण्यासाठी तोच तो भाग वारंवार ऐकता येतो.

२) स्वत:च्या मुल्यमापनासाठीही टेपरेकॉर्डरचा उपयोग होवु शेकतो. आपलेच गायन किंवा वादन आपण ध्वनीमुद्रीत करुन ऐकु शकतो किंवा दुसऱ्यांना ऐकवु शकतो स्वत:च्या झालेल्या चुका पुन्हा दुरुस्त करु शकतो.

३) विशेष म्हणजे टेपवरील ध्वनीमुद्रण पुसुण टाकून त्यावर पुन्हा नव्याने ध्वनी मुद्रण करता येते. आर्थीक दृष्टया ही सर्वसामान्य अभ्यासक्रमाला हे साईचे होते. टेपरेकॉर्डरच्या क्षेत्रात सुधारणा होवुन त्याचे रुप आता कॉम्पॅक्ट डिस्क (C.D.) D.V.D. ने घेतले आहे. त्यामुळे ध्वनीमुद्रण आर्थिक निर्दोष व दिर्घ कालावधी पर्यंत टिकणारे असते.

**दृकश्राव्य साधने :-**

जी साधने फक्त ऐकूच येत नाही तर डोळयांनी दिसतात सुध्दा त्यांना दृक श्राव्य साधने असे म्हणतात.

**१) टेलीव्हीजन (T.V.) :-**

दृक आणि श्राव्य या दोन्ही साधनात न आढळणारा सर्वात मोठा लाभ टेलीव्हीजन च्या माध्यमाने आपल्यापर्यंत उपलब्ध झाला तो म्हणजे दृक व श्राव्य अशा दोन्ही गोष्टीचा मेळ एकाच वेळी या ठिकाणी घडुन येतो. जॉन लॉग बेथर्ड ने १९२६ साली T.V. चा शोध लावला. १९५८ मध्ये भारतात तीचा प्रवेश झाला. १९७२ मध्ये मुंबई दुरदर्शनने जन्म घेतला. आणि १९८२ पासुन कृष्ण-धवल चित्रामधुन रंगीत चित्राला प्रारंभ झाला. 'सत्यम शिवम सुंदरम' हे घोष वाक्य घेवून दुरदर्शन ने शहरांपासुन तर खेडयापर्यंत आपली सत्ता प्रस्थापीत केली. आणी संगीताचे रसीक, अभ्यासक सर्वांमध्येच चैतन्य आले. आजपर्यंत केवळ गायक वादकाचे ध्वनी मुद्रण श्रवण करण्यात धन्यता माणनारे टि.व्ही. मुळे संपुर्ण मैफलीचा प्रत्यक्ष आस्वाद घेवु लागले. कलाकारांचे हावभाव त्यांच्या हालचाली, वादकांच्या बोटांची फीरत, नृत्याचे पदन्यास, अभीनय शैली साथीदारांची बैठक, सर्व जवळुन टिपु लागले. आजपर्यंत फक्त नावे ऐकलेले कलाकार किंवा वादये आता डोळयांनी दिसु लागली.

आज तर अनेक चॅनल वर संगीताचे कार्यक्रमाची रेलचेल सुरुच असते. गायन व वादनाप्रमाणेच नृत्याचे ही कार्यक्रम सुरु असतात. श्राव्य साधनाप्रमाणे संपुर्ण कार्यक्रम हा चित्रमुद्रीत, ध्वनीमुद्रीत करण्याची सोय दृकश्राव्यसाधना मध्ये आहे.

**२) इतर आधुनिक साधने :-**

यामध्ये कॉम्प्युटर, मोबाईल, चिप्स, सि.डी. प्लेअर, पेनड्राईयु अशा अनेक साधनांचा ही समावेश करावा लागेल. नखाप्रमाणे लहान असलेली चिप्स मुर्ती लहान पण किर्ती महान याप्रमाणे कोणत्याही ध्वनीचे मुद्रण करुन ते ऐकता किंवा पाहता येते. मोबाईल क्रांतीमुळे तर दृष्य श्राव्य साधनाचा सुमेळच साधला गेला आहे. इंटरनेटच्या माध्यमाने मोबाईलवर केव्हाही कुठेही कोणतेही संगीत ऐकता किंवा पाहता येते. तसेच ते जतन ही करता येते. मनोरंजना सोबत ज्ञान अर्जीत करण्यासाठी विज्ञानाने एक प्रकारे वरदाण दिले आहे. फक्त त्याच्याशी आपले सुर जुळले म्हणजे झाले.